PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Ashta roop jai vaibhav lakshmi mata
Year: 2001

Song: Ekaki ekali me
Lyricist: Jagdish Khebudkar

एकाकी एकली मी
ओढ तुझी लागता
कसे करू उद्यापन मी
कशी करू सांगता ....
सोहळा मांडला मी
पूजेला कोणी नाही
सोहळा मांडला मी
पूजेला कोणी नाही
लक्ष्मी तू धाव घेई
आई तू धाव घेई
लक्ष्मी तू धाव घेई
आई तू धाव घेई

संसार मंदिरी या रामाचं राज्य होतं
पुण्याई सरली का खऱ्याचं झालं खोटं
तुझीच रूपं सारी सजल्या दिशा दाही
लक्ष्मीची रूपं सारी सजल्या दिशा दाही
लक्ष्मी तू धाव घेई
आई तू धाव घेई
लक्ष्मी तू धाव घेई
आई तू धाव घेई

आकांत करते मी ऐक तू माझे आई
सामर्थ्य देई मला पाठीशी उभी राही
व्रताची आण तुला हाकेला साद देई
व्रताची आण तुला हाकेला साद देई
लक्ष्मी तू धाव घेई
आई तू धाव घेई
लक्ष्मी तू धाव घेई
आई तू धाव घेई

भक्तांची तारणकर्ती तू वैभवलक्ष्मी माता
दीनांची रक्षणकर्ती तू वैभवलक्ष्मी माता
सृजनांची आशापूर्ती तू वैभवलक्ष्मी माता
नारीची संकटहर्ती तू वैभवलक्ष्मी माता
तू गजलक्ष्मी तू आदिलक्ष्मी
तू विजयालक्ष्मी ऐश्वर्यलक्ष्मी
तू विरलक्ष्मी तू धान्यलक्ष्मी
संतानलक्ष्मी तू वैभवलक्ष्मी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*